## नि.दि.मु.क्र. १०३/२०१६ मधील निशाणी ७७ वरील आदेश

सदरहू अर्ज वादीनी मयत प्रतिवादी क्र. २ व ९ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेल्या अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे. सदर अर्जावर प्रतिवादीनी त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, मयत प्रतिवादी क्र. २ भिमराव विष्णू कचरे हे दि. ३०/०१/२०२१ रोजी व प्रतिवादी क्र. ९ मनिषा हंबरराव चव्हाण या दि. १६/०२/२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदरचा अर्ज दाखल करणेस त्यांना सुमारे अनुक्रमे ८ व ७ महिने इतका विलंब झाला आहे. वादी यांना कायदयाने ज्ञान नसलेने व वारस रेकॉर्डवर घेणेकामी आवश्यक माहिती वकीलांना वेळेत देता आली नाही. त्यामुळे झालेला विलंब हा हेतू पुरस्सर नाही. दावा गुणदोषावर चालविण्याकरीता अबेटमेंटचा आदेश रद्द करून सदरचा अर्ज मंजूर करणे अत्यंत गरजेचे आहे. अर्ज मंजूर न केल्यास वादीचे कधीही न भरून निघणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. प्रतिवादींचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादीने अर्जात नमूद मजकूर व मागणी चूकीची आहे. उशीरा माफीचे कारण संयुक्तीक नाही. मयत प्रतिवादीं हे एकत्र कुटुंबातील असताना वादीने मुद्दामहून मुदतीत वारस रेकॉर्डवर घेतले नाहीत. वादीने सुमारे ८ महिन्याचा विलंब जाणूनबूजून केला असलेने वादीचा अर्ज नामंजूर करावा. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. वैकल्पीकरित्या, अर्ज मंजूर केलेस खर्च र.रू. ५०००/– चे वर मंजूर करण्यात यावा.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. मयत प्रतिवादी क्र. २ हे दि. ३०/०१/२०२१ रोजी व प्रतिवादी क्र. ९ या दि. १६/०२/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज दि. २०/१२/२०२१ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदरचा अर्ज दाखल करणेस अनुक्रमे अंदाजे ८ व ७ महिन्यांचा विलंब झालेला आहे. वादी हे वयस्कर आहेत. अर्जानुसार त्यांना कायदयाचे ज्ञान नसल्याचे दिसून येते. तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये कोराना महामारीचा प्रादुर्भाव होता. करीता, अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबा बाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण अर्जामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदरचा दावा वारसहक्कांच्या मिळकती जाहीर होवून व वाटप होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये अचल संपत्तीबाबतच्या महत्वाच्या अधिकारांचे वाद प्रश्न अंतर्भुत आहेत. झालेला विलंब जाणीवपूर्वक असल्याचे दिसून येत नाही. सदरची परवानगी न दिल्यास

वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादीचे तसे कोणतेही नुकसान होणार नाही. झालेला विलंब हा प्रतिवादींना योग्य तो खर्च देवून त्याची भरपाई करण्यासारखा आहे. परिणामस्वरूप, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश.

**– : आ दे श :–**

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ७७) रक्कम रुपये २००/– चा खर्च प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. सदरचा खर्च हा पुढील तारखेपर्यंत देण्याचे आहे.

२) प्रतिवादी क्र. २ व ९ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश येणेप्रमाणे रद्द करण्यात येतो.

Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2022.07.06 10:51:09 +0530

पाटण (प्र.शं. गिरगांवकर )

दि. ०५/०७/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.